Shinde Vrushali Santosh
Senior Runner Up 2
Shree Ram Vidhyalaya, Airoli Sec 3
Mumbai



## ''डिजिटल टेक्नोलॉजी: त्यामुळे तुमच्या जीवनात कशी सुधारणा होते? देशाच्या आणि नागरिकांच्या प्रगतीसाठी डिजिटल टेक्नोलॉजीच्या क्षेत्रात काय करण्याची गरज आहे असे तुम्हाला वाटते?''

डिजिटल टेक्नोलॉजी यामुळे आपला भारत देश आज औद्योगिक प्रगती करत आहे. औद्योगिक क्रांती प्रथम इंग्लंडमध्ये झाली त्यानंतर ती युरोप खंडात पसरली हळूहळू अशिया खंडात आली नंतर भारत औद्योगिक क्रांतीस सुरुवात झाली. शतकापूर्वी आपला भारत देशाला 'सोने की चीडिया' म्हणायचे. पण ब्रिटिश राजवटी आल्यापासुन आपण भारत देश अक्षरक्ष: तळघाईला लागला.

पण म्हणतात ना: 'शून्यातुन माणूस ती प्रगती करतो त्याच प्रगतीच्या जोरावर तो बाकीच्या गोष्टी आपल्या कवेत करुन घेतो. याप्रमाणे आपल्या भारत देशाचेही असेच झाले. जरी आपला देश दशकोपूर्वी गरीब असला, त्याकडे काही टेक्नोलॉजी नसली तरी आज तोच भारत देश टेक्नोलॉजीच्या जोरावर अभिमानाने इतर काही प्रगत राष्ट्रांबरोबर येण्यास सज्ज झाला आहे. हे सगळे झाले आहे 'डिजिटल टेक्नोलॉजी' मुळे.

आपल्या पृथ्वीला निर्सगाने दिलेली एक देणगी म्हणजे साडे, झुडपे, प्राणी, पक्षी इ. आज भारत देशात सर्वात जास्त नैसर्गिक साधनसंपत्ती आहे, पण मला वाटते त्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा आपण पुरेपुर वापर केला पाहिजे. आपण त्या संपत्तीचा पूर्णपणे वापर करुन घेतो. पण तितकाच आपण निर्सगाला धोका देतो तो म्हणजे अतिरिक्त वापराने, कारखान्यांतुन गळती होणाऱ्यां विषारी वायू मुळे.

मला सांगा, आज आपल्या देशात काय कमी आहे. जी इतर देशांत अतिशय कमी असते अशी नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. डिजिटल टेक्नोलॉजी उपलब्ध आहेत. पण तरीही आपला भारत अजुन मागेच का आहे? का? आपल्या देशाची एवढी प्रगती होऊनही का आपल्याला इतर देशांकडे इतर राज्यांकडे मदतीसाठी हाथ पसरावे लागतात. खरे तर डिजिटल टेक्नोलॉजी आहे, आज प्रत्येक मुलाच्या हातात आपल्याला आयफोन दिसतो. आपल्या देशात एवढे कारखाने उभे राहिले आहेत. कारखान्यांतून जे खराब विषारी वायू निघतात ते नदीत सोडले जातात, त्यामुळे लोकांच्या जीवाला बाधा होते. मग आपली टेक्नोलॉजी आपण इथे वापरुन त्या विषारी पाण्याला शुद्ध करुन नाही का नदीत सोडु शकत?

आज या डिजिटल टेक्नोलॉजीमुळे आपल्याला अवकाशातील अनेक गृहांचा शोध घेता आला आहे. या टेक्नोलॉजी मुळे मानवाला आकाशात उंच झेप घेता आली आहे. आज आपला देश जी प्रगती करत आहेत, ती फक्त 'डिजिटल टेक्नोलॉजी'मुळे. आज या टेक्नोलॉजीमुळे आपण संगणकाचे व इतर काही वस्तुंचे छोटे छोटे पॉर्टस् बनवुन इतर देशांना निर्यात करतो. आज टेक्नोलॉजीमुळे आपली एवढी प्रगती झाली आहे की ज्यामुळे आपण इतर देशांना निर्यात करुन त्या गोष्टी आपल्याला पुरवु शकतो. टेक्नोलॉजीमुळे आपला भारत देश आज काही प्रगतशील देशांच्या बरोबरीने बसा तयार आहे.

या टेक्नोलॉजीचे काही तोटेदेखील आहे. मी आधी सांगितल्याप्रमाणे नैसर्गिक संपत्तीची हानी अधिक होत आहे, तर मला वाटते की आपल्या भारत सरकारने 'यावर' काही प्रभावी उपाय सुचवावे. जितका आपण आपला देश प्रगतीमय बनवु शकतो. तितकाच आपण आपल्या देशातील लोकांची व नैसर्गिक संपत्तीची काळजी घेऊ शकतो, असे मला वाटते. भारत आज टेक्नोलॉजीच्या जगात खूपच पुढे गेला आहेत. पण त्यातही काही त्रुटी, काही गरजा आहेत, त्या सरकाने भरुन काढाव्यात, असे वाटते. आपल्या भारतात अनेक तरुण व्यक्ती आहेत. त्यांकडील कल्पनाशक्ती, ताज्यातवाण्या जाणिवा व त्यांतील मुबलक उर्जेचा लाभ सरकारने घेतला पाहीजे व आपल्या देशाच्या भावी नागरिकांना एक महान राष्ट्र उभारण्यासाठी एक संधी द्या.


Marathi